# सेमिनार अहवाल (दि.०३/६/२०२२)

“कठोपनिषदातील व्यवहारिक तत्त्वज्ञान” ऑनलाईन एकदिवशीय राष्ट्रीय सेमिनार



महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद व तत्त्वज्ञान व तर्कशात्र विभाग, IQAC विभाग व ग्रंथालय विभाग विद्यावर्धिनी सभेचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविध्यालय, धुळे यांच्या संयुक्त विध्यमाने “कठोपनिषदातील व्यवहारिक तत्त्वज्ञान” या विषयावर एकदिवशीय राष्ट्रीय सेमिनारचे आयोजन दि.०३ जून २०२२ रोजी करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. देवेंद्र विसपुते हे होते तर उद्धाटक महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे अध्यक्ष डॉ सुनीलदत्त गवरे होते. प्रमुख पाहुणे संस्कृत विभाग, मुळजे जेठा महाविद्यालय ,जळगाव येथील प्रा डॉ. अखीलेश शर्मा हे होते दुःख निवृत्तीचा मार्ग उपनिषदात आहे, उपनिषदांचा अभ्यास केल्यास मनातील मृत्यूचे भय पळून जाते, उपनिषदातील विचार विश्ववंद्य आहेत, उपनिषद हे ज्ञानाचे भांडार आहे .त्या ज्ञानाचा उपयोग करून मानवी जीवन यशस्वीरीत्या जगता येईल तसेच उपनिषदातून मानवतेची शिकवण दिली जाते,या शिकवणीचा फायदा विश्व शांततेसाठी नक्कीच करून घेता येईल असा सल्ला त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक डॉ. बाजीराव पाटील यांनी केले, स्वागत गीत प्रा. आभा बागाईतकर यांनी गायले पाहुण्यांचा परिचय सहसमन्वयक प्रा. विजय पालवे तर आभार सहसमन्वयक प्रा. बाळासाहेब गणपाटील यांनी मानले.



कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य प्रो डॉ योगेश पाटील,उपप्राचार्य डॉ विजय भुजाडे,कार्यक्रमाचे समन्वयक ग्रंथपाल वाय. एन. पाटील, डॉ. सर्जेराव गोल्डे व महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील जेष्ठ विचारवंत विचारशलाका त्रैमासिकाचे संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार' कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. दिनेश नाईक, मतप् चे कार्याध्यक्ष डॉ अमण बगाडे ,महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे सर्व पदाधिकाऱ्यांसह देशाच्या विविध भागातील तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, संशोधक व तत्वज्ञान प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



“कठोपनिषदातील व्यवहारिक तत्त्वज्ञान”
ऑनलाईन एकदिवशीय राष्ट्रीय सेमिनारची क्षणचित्र

सेमिनारमध्ये सहभागी

सेमिनार मध्ये रिसोर्स पर्सन बोलतांना डॉ. अखिलेश शर्मा, जळगांव

अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. देवेंद्र विसपुते

## दै. वर्तमानपत्रात आलेली बातमी

मंगळवार दि. ७ जून २०२२ — आँडाजडती — पान ३

## राज्यात नवीन १२ संवर्धन राखीव क्षेत्रासह, ३ अभयारण्य घोषित

* औरंगाबादच्या जायकवडी पाणी पुरवठा योजनेच्या कामालाही मान्यता
* मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखालील राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत निर्णय





## उपनिषदं आचरण धर्म शिकवतात-डॉ.अखीलेश शर्मा

---

पुण्य नगरी

जळगाव-धुळे मंगळवार, ७ जून २०२२

## उपनिषदं आचरण धर्म शिकवतात : डॉ.अखिलेश शर्मा



धुळे : शहरातील विद्यावर्धिनी महाविद्यालयात महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद, तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र, विभाग व ग्रंथालय विभागाच्या संयुक्त विद्यमाने कठोपनिषदातील व्यवहारिक तत्त्वज्ञान या विषयावर एक दिवसीय आभासी राष्ट्रीय सेमिनार घेण्यात आले. उपनिषदं हे माणसाला आचरण धर्म शिकवतात, असे प्रतिपादन डॉ.अखिलेश शर्मा यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.देवेंद्र विसपुते होते. कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे अध्यक्ष डॉ.सुनीलदत्त गवरे यांनी केले. डॉ.शर्मा म्हणाले, दुःख निवृत्तीचा मार्ग उपनिषदात आहे. उपनिषदांचा अभ्यास केल्यास मनातील मृत्यूचे भय पळून जाते. उपनिषदातील [illegible] हे ज्ञानाचे भांडार आहे. त्या ज्ञानाचा उपयोग करून मानवी जीवन यशस्वीरीत्या जगता येईल. तसेच उपनिषदातून मानवतेची शिकवण दिली जाते. या शिकवणीचा फायदा विश्व शांततेसाठी नक्कीच करून घेता येईल, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बाजीराव पाटील यांनी केले. स्वागत गीत प्रा.आभा बागाईतकर यांनी गायले. पाहुण्यांचा परिचय सहसमन्वयक प्रा. विजय पालवे यांनी करून दिला. आभार सहसमन्वयक प्रा. बाळासाहेब गणपाटील यांनी मानले. यशस्वीतेसाठी उपप्राचार्य प्रा.डॉ.योगेश पाटील, उपप्राचार्य डॉ.विजय भुजाडे, ग्रंथपाल वाय. एन. पाटील, डॉ. सर्जेराव गोल्डे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार, विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ.दिनेश नाईक, डॉ

---

दैनिक दिव्य मराठी

दिव्य सिटी

धुळे. सोमवार, ६ जून २०२२ | ज्येष्ठ शु.६, शके १९४४

## उपनिषद आचरणासह धर्म शिकवता, मृत्यूचे भय घटते

### डॉ. शर्मा यांचे प्रतिपादन, विद्यावर्धिनी कॉलेजला कार्यक्रम

प्रतिनिधी । धुळे

उपनिषद हे मनुष्याला आचरणासह धर्म शिकवतात. दुःख निवृत्तीचा मार्ग उपनिषदात आहे. उपनिषदांचा अभ्यास केल्यास मनातील मृत्यूचे भय पळते असे प्रतिपादन डॉ. अखिलेश शर्मा यांनी केले.

शहरातील विद्यावर्धिनी महाविद्यालयात महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद, तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र, विभाग व ग्रंथालय विभागातर्फे कठोप निषदातील व्यवहारिक तत्वज्ञान याविषयावर एक दिवसीय आभासी राष्ट्रीय सेमीनार झाला. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. देवेंद्र विसपुते होते. महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुनीलदत्त गवरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या वेळी अखिलेश शर्मा म्हणाले की, उपनिषदातील विचार विश्ववंद्य आहे. उपनिषद हे ज्ञानाचे भांडार आहे. त्याच्या ज्ञानाचा उपयोग करून मानवी जीवन यशस्वीरित्या जगता येईल. तसेच उपनिषदातून मानवतेची शिकवण दिली जाते. या शिकवणीचा फायदा विश्व शांततेसाठी नक्की करून घेता येईल, असेही ते म्हणाले. विचारशलाका त्रैमासिकाचे संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. दिनेश नाईक, डॉ. अमण बगाडे आदी ऑनलाईन उपस्थित होते. संयोजक डॉ. बाजीराव पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. आभा बागाईतकर यांनी स्वागत गीत सादर केले. सहसमन्वयक प्रा. विजय पालवे यांनी परिचय करून दिला. सहसमन्वयक प्रा. बाळासाहेब गणपाटील यांनी आभार मानले. उपप्राचार्य प्रा. डॉ. योगेश पाटील, उपप्राचार्य डॉ. विजय भुजाडे, वाय. एन. पाटील, डॉ. सर्जेराव गोल्डे यांनी संयोजन केले.

---

संयोजक

प्रा.डॉ.बाजीराव माणिकराव पाटील

विभाग प्रमुख, तत्त्वज्ञान व तर्कशात्र